**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.डी.एन.गळवे यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>**

१५. हे म्हणणे खरे आहे की, मी मासाळवाडीचा उपसरपंच आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी गेली १० वर्षे राजकारणात आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला भाऊ बहिण किती आहेत याची मला प्रत्यक्ष माहिती नाही. आरोपीच्या भावाचे नाव निखिल आहे. बहिणीचे नाव मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी राजकारणात सक्रीय असल्यामुळे कोणताही कामधंदा करत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आटपाडी एस.टी.स्टँडच्या पाठीमागे आरोपीची भरपूर जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे आटपाडी एस.टी.स्टँडच्या समोर राहते घर आहे.

प्रश्न – घराला लागून आरोपीचे इलेक्ट्रीकचे भले मोठे दुकान आहे.

उत्तर – छोटे दुकान आहे.

हे म्हणणे खरे आहे की, आरोपी होलसेल आणि रिटेलमध्ये इलेक्ट्रीकच्या वस्तू विक्री करतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीची आर्थिक परिस्थिती चांगली आहे.

१६. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी आणि माझी ओळख मागील दोन वर्षात झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी राजकारण आणि समाजकारणात सक्रीय असल्यामुळे माझ्या गावातील काही लोकांना इलेक्ट्रीक वस्तू लागल्यास त्या आरोपीच्या दुकानातून घेवून देतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मित्र मंडळी पै पाहुण्यांना इलेक्ट्रीक वस्तू लागल्यास आरोपीच्या दुकानातून घ्यायला लावतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचे घर आणि दुकान एकत्र असल्यामुळे आरोपी त्याची महत्वाची कागदपत्रे म्हणजे पासबूक, बिल, चेक इत्यादी काऊंटरवर ठेवत

असतो.

१७. आयकर भरत नाही. माझ्या म्हणण्याप्रमाणे जी रक्कम मी आरोपीला दिली ती रक्कम कशी जमवली याबाबतचे नेमके वर्णन मला सरतपासात नमूद करायला काही अडचण नव्हती.

प्रश्न – मग तसे का नमूद केले नाही.

उत्तर – शेती आणि चायनिजमधील उत्पन्न असल्याचे त्यात लिहिलेले आहे.

हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासात नमूद केल्याप्रमाणे आरोपी उसनवार रक्कम पैशांची गरज असल्यावर घेवून जायचा आणि परत आणून द्यायचा याबाबतचा तपशीलवार नमूद करायला मला काही अडचण नव्हती.

प्रश्न – शितल देशपांडे आणि निलेश गायकवाड हे तुमचे मित्र आहेत.

उत्तर – दोघांचेही मित्र आहेत.

हे म्हणणे खरे नाही की, मला पैशांची गरज लागली की आरोपी मला पैसे द्यायचा.

१८. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्याकडून कधीही पैशाची मागणी केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला कधीही चेक दिलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी जो चेक हजर केलेला आहे त्याच्यावरील आरोपीची सही सोडली तर इतर मजकूर आरोपीच्या हस्ताक्षरातील नाही. हे म्हणणे खरे नाही की, धनादेश अनादरीत केल्यानंतर मी आरोपीला कळवले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी चेकप्रमाणे कधीही रक्कम देणे लागत नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्याकडे पैशाची मागणी केल्याबाबतचा माझ्या सरतपासातील उल्लेख मी खोटा केला आहे.

१९. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला कुठलाही चेक दिला नव्हता व तो वटेल अशी हमी देखील दिलेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी

माझ्या फिर्याद कलम ३ व ४ मध्ये नमूद केलेला मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात नमूद केलेला संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरुध्द खोट्या साक्षीदारांची नावे नमूद करुन फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्याद कलम १ मध्ये नमूद केलेले वर्णन संपूर्ण खोटे आहे.

२०. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शेतात डाळींबाच्या बागा असल्याबाबतचा कागदोपत्री पुराव मी या कामात दाखल केलेला नाही. साक्षीदार सांगतो की, मी दाखल करायला तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्याकडून हातउसनवार रक्कम कधीही नेली नव्हती.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

Sd/-xx

(वि. द. पाटील)

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

आटपाडी

आटपाडी

दिनांक : १२/१२/२०२३

03:53:53 PM

*****